**महाराष्ट्र शासन**
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक 10036, मुंबई 400 001.
WWW.DVET.GOV.IN e-mail:desk6@dvet.maharashtra.gov.in Phone No.22621008/22620191/FaxNo 22675628

**ई-मेल द्वारे**
**प्रथम प्राधान्य**

पत्र क्र. 6/व्हीओसी/2014/४४३
दिनांक - 04/09/2014

प्रति,
1. सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

2. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
सर्व.

**विषय :- शासन मान्यतेबाबत द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या सन 2014-15 च्या 11 वी ला प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश याद्यां सादर करणेबाबत ......**

संचालनालयाने अ.शा.पत्र क्र. 6/व्हीओसी/2014/419 दि.20/8/2014 चे (ई-मेलद्वारा दि.21/8/2014) अन्वये +2 स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या पाठविलेल्या यादीप्रमाणे तसेच 2013-14 व 2014-15 या सत्रात शासनाने प्रवेश दिलेल्या व संचालनालयाने प्रवेशास परवानगी दिलेल्या संस्थातील 11 वी ला प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश यादी मंजूर करुन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ पुणे यांना सादर करण्यासाठी सोबतच्या वेळापत्रका प्रमाणे संचालनालयास सादर करावी. ज्या संस्थानी प्रवेश याद्या सादर केलेल्या नाही किंवा परवानगी नसताना प्रवेश दिले असल्यास ते प्रवेश अनधिकृत घोषित करण्यात यावेत. तसेच सन 2013 या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 20 राजपत्र दिनांक 21.8.2013 अन्वये प्रसिध्द झालेल्या अधिनियमाद्वारे अनधिकृत संस्था स्थापन करण्यास अथवा अनधिकृत पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरहू संस्थेविरुध्द महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 20 राजपत्र दिनांक 21.8.2013 अन्वये प्रसिध्द झालेल्या अधिनियमा प्रमाणे संबंधित संस्थेवर कार्यावाहीचा प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात यावा व तश्या स्पष्ट सूचना संस्थांना देण्यात याव्यात. ज्या संस्थाकडून विहीत मुदतीत याद्या सादर करण्यात येणार नाही त्यांची राज्य परिक्षा मंडळ पुणे यांच्याकडून परिक्षा घेण्यात येणार नाही.

संस्थेची माहिती जसे संस्थेचे नाव, पत्ता, प्राचार्यांचे नाव, ई-मेल आयडी, भ्रमणध्वनी इत्यादी सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये .xls sheet मध्ये स्वतंत्रपणे संस्थानिहाय सादर करावे. सर्व पत्रव्यवहार व माहिती ISM6 Unicode च्या DVOT font मध्येच करण्यात यावा.

विलंबाने सादर केलेल्या याद्या ग्राह धरण्यात येणार नाहीत करिता विहित मुदतीत माहिती प्राप्त करून घेण्याची दक्षता घ्यावी. सोबत वेळापत्रक, प्रमाणपत्राचा नमुना, प्रपत्र 1 व प्रपत्र 2 .xls sheet जोडण्यात आले आहे. वेळापत्रक सर्व संस्थांच्या निदर्शनास त्वरित आणून देण्यात यावेत.

(ज.द. भुतांगे),
संचालक(व्यशि)

सोबत - वरील प्रमाणे

# वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाही | विषय /माहिती /तपशिल | कोणास सादर करावयाचे | सादर करण्याचा अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्व संस्थानी | द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या प्रवेश याद्या | जिल्हा व्यवसाय शिक्षण कार्यालयास | 20/09/2014 पर्यंत |
| 2 | जिल्हा व्यवसाय शिक्षण कार्यालयांनी | फक्त मान्यता प्राप्तच व संचालनालयाने प्रवेशास मान्यता दिलेल्या याद्या प्रमाणित करणे | प्रादेशिक कार्यालयास | 25/09/2014 पर्यंत |
| 3 | प्रादेशिक कार्यालयांनी | संस्था व विद्यार्थ्यांची संख्या तपासुन त्यांच्या अधिपत्याखालील सर्व जिल्ह्यांच्या याद्या | संचालनालयास | 30/09/2014 पर्यंत |
| 4 | संचालनालयाने | प्रादेशिक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या याद्या | परिक्षामंडळ पुणे यांना | 8/10/2014 पर्यंत |

# प्रमाणपत्र

जिल्हा -------------------- वरिल प्रपत्रात नमुद सर्व संस्था शासन व संचालनालयाने प्रवेशासाठी मान्यता दिलेल्या असून फक्त व्यावसाय अभ्यासक्रम / तुकडया शासन मान्यते प्रमाणे प्रवेश दिले आहेत. यात अंनधिकृत प्रवेश दिल्याचे निदर्शनास आल्यास त्याची सर्व जबाबदारी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिका-यांची राहिल.

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी

---

# प्रमाणपत्र

प्रादेशिक कार्यालय यांनी उपलब्ध संस्थांच्या नोंदीनुसार ------------- जिल्ह्यातील सर्व शासनमान्य/ संचालनालयाने प्रवेशास परवानगी दिलेल्या असून, उपल्ब्ध दस्ताऐवजा प्रमाणे बरोबर असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. अनधिकृत प्रवेश केलेल्या संस्थांवर तपासणी अंती कार्यवाही साठी प्रस्ताव 15 दिवसात संचालनालयास सादर करण्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

सहसंचालक

# प्रपत्र 1

11 वी द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या याद्या खालील प्रपत्राप्रमाणे प्रमाणित करून सादर करणे.

| जिल्हा | तालुका | अ. क्र. | संस्थेचे नाव | व्यवसाय अभ्यासक्रम चे नाव | तुकडया | प्रवेश-क्षमता | शासन मान्यतेचे पत्र क्रमांक | परवानगीचे वर्ष | 2014-15 11 वी प्रवेशित विद्यार्थी संख्या व्यवसाय निहाय | पूर्ण वेळ शिक्षकाचे नाव व शैक्षणिक अर्हता | पूर्ण वेळ निदेशकाचे नाव व शैक्षणिक अर्हता | पदांच्या नियुक्तीस मान्यता आहे/नाही | नसल्यास कारणे | यापूर्वी संस्थेनी अनिधिकृत प्रवेश केले आहे काय? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

टिप -
1. पत्रा क्र.419 दि.20/08/2014 च्या यादी प्रमाणे अनुक्रमांक देण्यात यावेत.
2. संस्था अधिकच्या झाल्यास त्यांचे स्वतंत्र प्रपत्र देण्यात यावेत.
3. तुकडया वाढ झाल्यास परवानगी वर्ष लिहिण्यात यावे .
4. व्यवसाय अभ्यासक्रमात बदल झाले असल्यास शासन आदेश क्रमांक व वर्ष नमुद करावा.

# प्रपत्र 2

## + 2 स्तरावरील द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या शाळांची माहिती

शासकीय

| S. No. | Name of the School/ College | Full Address of the School/ College | Village Name | Taluka Name | District Name | Phone No. | E-mail address of the School/ College | Name of the Head master/ Principal | Mobile No. of the Principal/ Head master | E-mail address of the Principal/ Head master | Course Name | No of Division | Intac capacity |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | शाळेचे/ कॉलेजचे नाव | शाळा/ कॉलेचा पूर्ण पत्ता | गावाचे नाव | तालुक्याचे नाव | जिल्ह्याचे नाव | शाळा/ कॉलेचा दूरध्वनी क्रमांक | शाळा/ कॉलेचा ई-मेल आडी | मुख्यध्यापक/ प्राचार्यांचे नाव | मुख्यध्यापक/ प्राचार्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक | मुख्यध्यापक/ प्राचार्यांचा ई-मेल आडी | अभ्यासक्रमाचे नाव | तुकडयांची संख्या | प्रवेश क्षमता |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

अशासकीय अनुदानित

| अ. क्र. | शाळेचे/ कॉलेजचे नाव | शाळा/ कॉलेचा पूर्ण पत्ता | गावाचे नाव | तालुक्याचे नाव | जिल्ह्याचे नाव | शाळा/ कॉलेचा दूरध्वनी क्रमांक | शाळा/ कॉलेचा ई-मेल आडी | मुख्यध्यापक/ प्राचार्यांचे नाव | मुख्यध्यापक/ प्राचार्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक | मुख्यध्यापक/ प्राचार्यांचा ई-मेल आडी | अभ्यासक्रमाचे नाव | तुकडयांची संख्या | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

अशासकीय विनाअनुदानित

| अ. क्र. | शाळेचे/ कॉलेजचे नाव | शाळा/ कॉलेचा पूर्ण पत्ता | गावाचे नाव | तालुक्याचे नाव | जिल्ह्याचे नाव | शाळा/ कॉलेचा दूरध्वनी क्रमांक | शाळा/ कॉलेचा ई-मेल आडी | मुख्यध्यापक/ प्राचार्यांचे नाव | मुख्यध्यापक/ प्राचार्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक | मुख्यध्यापक/ प्राचार्यांचा ई-मेल आडी | अभ्यासक्रमाचे नाव | तुकडयांची संख्या | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |